# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>


<u>वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञापन खाते यांचे कार्यालय 'सी' विभाग मनपा कार्यालय इमारत , रुम नं.१५, पहिला मजला,७६,श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी मरीन लाईन्स (पूर्व),मुंबई – ४०० ००२</u>


**क्र.सआसी / ३६७१ /अनुज्ञापन/अति.निर्मु दि.29.05.2026**

**विषय:** 'सी' विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून करण्याकरिता म.न.पा च्या संकेत स्थळावर जाहिरात प्रदर्शित करणेबाबत.

**संदर्भ:** उप आयुक्त (परि-०१) यांची दि.१३.०५.२०२६ रोजी एमडीबी / ६८३ अन्वये मंजुरी .

उपरोक्त संदर्भित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,'सी' विभागातील अनुज्ञापन खात्याच्या अतिक्रमण निर्मुलन विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता ६ कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाची आहे. या कामासाठी एका स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेची निवड करण्याबाबतची जाहीर सुचना म.न.पा संकेत स्थळावर प्रदर्शित करावयाची आहे.

सदर जाहीर सुचना कृपया म.न.पा. संकेत स्थळावर दि. ०१.०६.२०२६ ते ०५.०६.२०२६ या कालावधीमध्ये प्रदर्शित करण्यात यावी. सोबत जाहीर सुचनेची प्रत जोडण्यात आलेली आहे.

**सही/-**
**सहाय्यक आयुक्त 'सी' विभाग**

**<u>ए.बी.एम.पीएमओ (सॅप प्रोजेक्ट)</u>**

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**क्र.सआ/सी/ ३६७१ /अनुज्ञापन/अति.निर्मु दि. 29.05.2026**

## <u>जाहीर सुचना</u>

**विषय** – 'सी' विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यासाठी अशासकिय संस्थेकडून (एन.जी.ओ.) मार्फत कंत्राटी कामगार पुरवठा करण्याबाबतची जाहीर सुचना

सदर सूचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अशासकिय संस्थांना कळविण्यात येते की, 'सी' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणा-या इच्छूक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था या संस्थाकडून माहे **एप्रिल ते सप्टेंबर २०२६** या कालावधीकरीता अतिक्रमण निर्मूलन वाहनावर एकूण ०६ कंत्राटी कामगार पुरविण्याकरीता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मूलन), बृहन्मुंबई महानगरपालिका 'सी' विभाग कार्यालय, पहिला मजला, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी स्मशानभुमीच्या बाजुला, मरिन लाईन (पू) मुंबई – ४०० ००२ येथे १६००/- (रुपयावर १८% वस्तु व सेवा कर) आकारून (ना-परतावा) रोख स्वरूपात चलन काढून **दि.०१.०६.२०२६ ते ०५.०६.२०२६** या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि.०५.०६.२०२६ पर्यंत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते 'सी' विभाग कार्यालय, पहिला मजला, येथे सिलबंद पेटीत टाकावे.निकषानुसार पात्र सुचीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या एका संस्थेला कामाचे वाटप सी विभागाचे सहाय्यक आयुक्त कामाच्या अटी व शर्तीनुसार करतील. सोडत पध्दतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार, सहाय्यक आयुक्त 'सी' विभाग यांना राहतील.नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरीची तारीख दि. ०५.०६.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.
उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'सी' विभाग**

# BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA

**Licence (Encroachment ) C ward**

ACC / 3671 / Ench.Rem. Date: **29.05.2026**

## Public Notice

**Subject** : Public notice regarding supply of contract labour through Local Unemployed Service Co-operative Society for removal of unauthorized hawkers in C Ward.

In the financial year 2026-27 applications are invited for providing 6 contract labour from the local unemployed service co operative organization by preparing the eligiblity list, selecting by lottery system to work on encroachment removal vehicle from April to September 2026 (excluding Sunday and public holidays) 06 workers are required for per day from this selected organization.

Application sampal are available in Senior Inspector (Encroachment) Licence department C Ward office, First Floor, Shrikant Palekar Marg,Near Chandanwadi, Marine lines,Mumbai -400002 by paying cash Rs.1600/- plus 18% GST in cash form (non refundable) and by drawing challan from dt 01.06.2026 to 05.06.2026 in the morning between 11.00 am to 02.00 pm and sealed application along with required documents can be dropped in the sealed box kept at C Ward office, First Floor, Shrikant Palekar Marg,Near Chandanwadi, Marine lines,Mumbai -400002 According to the crieteria, the Assistant Commissioner of C Ward shall allocated the work to an organization which is successful through the lottery system from the elegible list as per the terms and conditions of the work.

Last date of application will be 05.06.2026 (Till 01.00 PM ). Any application fill after then will not be consider.

Lottery will be carried out at 3.00 pm on 05.06.2026

Please note that institutions not meeting the above crieteria will be disquallifed without assigning any reason.

Sd/-

**Asstt. Commissioner 'C' Ward**